प्रकरण - २

जैन तत्वज्ञानाचा केंद्रबिंदु : जीवतत्व

विश्व हे जसे एक कोडे आहे तसेच 'जीव', 'आत्मा', 'चेतना' हे देखील महान् कोडे आहे. सृष्टीच्या आदिकाळापासून ज्ञानवान माणसाला हे कोडे सोडविण्याचा छंद लागलेला आहे. धर्म आणि तत्वज्ञान यांनी हे कोडे उलगडायला मदत केलेली आहे. परंतु जेव्हा मानवजात अद्यापि ज्ञान-विश्वाच्या परिक्षेपांत आली नव्हती तेव्हा तिने बांधलेले ठोकताळे हे आज चुकीचे ठरलेले आहेत. अगदी हजारो वर्षापूर्वीचा मानव घेतला तरी त्याला जीव आणि शरीर यांच्या वेगळेपणाचा प्रत्यय आलेला दिसतो. इजिप्तमधील संस्कृती मेलेल्या माणसांच्या 'ममी' करुन हजारो वर्षे जतन करीत. काही जमाती पुरुन त्या मृत देहाचे रक्षण करी. काही शास्त्रज्ञ सांगतात की, पूर्वी वनात राहणाऱ्या मानवाने स्वप्न व निद्रा यांच्या अनुरोधाने आत्म्याची जाण निर्माण करुन घेतली होती.

पाश्चात्यांची कल्पना

प्लेटो नांवाचा मोठा दार्शनिक आपल्या 'द लॉज्ङ या ग्रंथात म्हणतो की, शरीराच्या पलिकडे काही आत्मसत्ता आहे. साक्रेटिसने देखील आत्मसत्तेला मान्यता दिलेली आहे. प्लेटो म्हणतो- "माणसाजवळ अत्यंत मोलाची गोष्ट कोणती असेल तर तो दिव्य आत्मा होय."

" Of all things that man has, next to God, his soul is the most divine and most truly his own, The soul is immortal, because its very ideas and essenceis the self-moved and self-moving, that which is the fountain and the beginning of motion to all that moves besides"

Dialogeus of Plato vol, v.P, 120.

यावरुन हे दिसून येते की, सॉक्रेटिस, प्लेटो यांच्या काळी आत्मतत्वांचा विचार सुयोग्य मार्गाने सुरु झाला होता. पाश्चात्य दार्शनिकांपैकीं अनेकांनी आत्म्याची वेगळी व स्वतंत्र सत्ता मान्य

केली असून शरीराच्या नाशाबरोबरच चेतनेचा नाश मानला नाही. तरी परंतु कर्म-नाश, मुक्ती, ज्ञानमय, एकाकार व आत्मतत्व यादृष्टीने पाश्चिमात्य दार्शनिक अर्ध्या वाटेवर आहेत.

मानसशास्त्रज्ञ व आत्मा

विज्ञानयुगाबरोबर मानस शास्त्राची वाटचाल सुरु झाली. मॅक्डुगल हा त्या शास्त्राचा शिरोमणी, अध्वर्यु. त्यानंतर आलेल्या अनेक मानस-शास्त्रज्ञांनी मानस-शास्त्राला व्यवहारात आणण्याचा प्रयत्न केला. परंतु अनेक व्याख्या देऊनही 'मन' म्हणजे काय याचे कोडे त्यांना सुटलेले नाही. आपलेकडे देखील "मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षया:" असे सांगितले आहे. बुद्ध देखील "मनो पुव्वंगमा धम्मा" असे सांगून शरीराच थोडे पुढे जाऊन मनाचे विश्लेषण करतात. जैन दृष्टीने मनाचे दोन विभाग आहे. एक द्रव्य मन. हे द्रव्य मन पौद्गलिक मनोवर्गणांनी (परमाणूंनी) बनलेले असते. त्या मनाचा आकार अष्टदल कमलाकृती असतो. दुसरे' भाव-मन म्हणजे द्रव्य-मनाचे उपादान (प्रमुख) कारण असते. द्रव्य मनाची कार्ये भाव-मनच निश्चित करीत असते. ही मनाची रचना केवळ स-मनस्क पंचेद्रिंय जीवांचे ठिकाणी असते.

भौतिकवादी मानसशास्त्रज्ञांचा विकास शारीरिक क्रियांच्या-प्रतिक्रियांच्या आधाराने होत आहे. परंतु त्या विकासाचा मूलभूत गाभा अपूर्ण व अज्ञानावर आधारलेला आहे. मनाचा स्वामी जीव आहे व त्या मनाच्या पलिकडे जाण्याची शक्ती ही जीवात्म्याची आहे. मानेसिक शक्तींचा जो प्रत्यय येतो तो वास्तविक आत्मशक्तीचाच प्रत्यय असतो. हे जर विसरले गेले तर सम्यक् उपलब्धी होणे कठीण.

जीव : जैन कल्पना

सहा द्रव्यापैकी जीव द्रव्याचा विचार जैनदर्शनाला अधिक प्रिय आहे. म्हणून तत्वार्थ सूत्रात - आत्मा हाच खरा दर्शनाचा आधार होय. म्हणून सात तत्वांचा (जीव, अजीव, आश्रव, बंध, संवर, निर्जरा व मोक्ष) उल्लेख करताना उमास्वामी एकवचनी उल्लेख करतात. जैन दर्शनाला आत्मतत्वच अधिक श्रेयस् होय. कारण दर्शनाचा मूळ उद्देश जीव-तत्वच होय. अचेतनाच्या वर्णनाला दर्शन म्हणता येत नाही.

जीव हे स्वतंत्र व सत्तात्मक द्रव्य आहे. द्रव्य म्हटल्यावर ते गुण व पर्याय यांनी युक्त आहे. गुण आणि पर्याय ही उत्पत्ती, स्थिती आणि विलय अशी त्रयात्मक आहे. याचा अर्थ जीवाच्या उत्पत्तीत, चतुर्गती भ्रमणात व मुक्तीत तो स्वत:च कारण आहे. ईश्वर, नियति, यदृच्छा, काल इ. कारणांचा परिहार त्यामुळे होतो. प्रत्येक चेतना ही स्वयंभू असून तिचे स्वातंत्र्य व पारतंत्र्य तिच्या स्वभाव व विभाव शक्तीवर अवलंबून आहे.

[१]जीव कसा आहे ?

जीवो उवओगमओ अमुत्ति कत्ता सदेह परिमाणो ।

भोत्ता संसारत्थो सिद्धो सो विस्सगोड्ढ गई ।। द्रव्यसंग्रह- २

जीव (आत्मा) हा दर्शनोपयोग व ज्ञानोपयोग यांनी सहित आहे. तो

---

१ जीवजीवाश्रव बंध संवर निर्जरा भोक्षस्तत्वम् -तत्वार्थसूत्र.

स्पर्श, रस गंध व वर्ण् यांनी रहित म्हणून अमूर्तिक आहे. त्या जीवाचा आकार त्याच्या योनीतील देहाप्रमाणे आहे. व मुक्त झाल्यावर शे्वटच्या शरीरापेक्षा किंचित कमी, पण, त्या शरीरासारखा आहे. तो जी कर्मे बांधतो त्या कर्माची फळे (सुख-दुखात्मक) चाखतो, म्हणून तो भोक्ता आहे. अदयापि सिध्द नसल्याने चतुर्गतीत भ्रमण करणारा म्हणून संसारी आहे. सिध्द होण्याची आंतरिक शक्ती आहे म्हणून तो सिध्द आहे किंवा कर्मबंधने रहित होऊन आपल्या ज्ञानमय एकाकार स्वरुपात रममाणा होतो म्हणून तो सिध्द आहे. असे वर्णन आचायर्य नेमिचंद्रांनी केले आहे. तत्वार्थसूत्रकार श्री उमास्वामी जीवाचे स्वरुप 'उपयोगो लक्षणम्' असे केले आहे. दर्शन आणि ज्ञान या दोन शक्ती म्हणेजेच जीव होय. आचार्यश्रेष्ठ व आध्यात्म-मार्गाचे सर्वश्रेष्ठ प्रवचनकार श्री कुंदकुंदानी शुध्द आत्माचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

[१] जो पस्सदि अप्पाणं अबध्द पुट्ठं आणण्णयं णियदं ।

अविसेसमसंजुत्तं त्तं सुध्द णयं विजाणीहि ।। समयसार -गाथा १४

आत्मा हा अबध्द आहे, अस्पर्शित आहे. अनन्य आहे. नियत आहे, अविशेष आहे, असंयुक्त आहे, हे जो जाणतो तोच शुध्द नय आहे. ही शुध्द नयची दिव्य अनुभूती म्हणजे आयत्माच होय. परंतु जीवाची जी अनादी कालीन सांसारिक व कर्मबंधाची अवस्था असते तीमुळे पांच प्रकारची अनेकता दिसून येते.

(१) अनादिकाळापासून कर्मरुपी चिखलात आत्मा रुतल्यामुळे कर्म-स्पर्शित-रुप दिसते.

(२) कर्मांच्या निमित्ताने जीव मनुष्य, पशु, देव, नारक इत्यादी गतीत व असंख्य योनीत हिंडल्यामुळे अनेक रुपात दिसतो.

(३) जीवात्म्याचे ठिकाणी असलेल्या अनंत ज्ञान, दर्शन, सुख व वीर्य

---

१ जीवो कत्ता य वत्ता य पाणी भोक्ता य पोग्गलो । धवला टीका प्र. पु. ११८ पान.

इत्यादी गुणांचा कर्मसंयोगाने कमी-अधीक प्रभाव दिसतो. त्यामुळे अशी धारणा होते की जीव अनियत आहे. एकरुप नाही.

(४) जीवात्मा एक ज्ञान-घन-रुप असतांना अनंत गुणरुप व विशेषात्मक दिसतो.

(५) कर्माच्या निमित्ताने होणारे रागव्देष व सुख-दु:ख-रुप परिणामांनी तो युक्त दिसतो.

हे पाचही शुध्द आत्मस्वरुपात असत नाही. कारण 'एकत्व' हेच त्याचे चिरंतरन, दिव्यस्वरुप होय. सर्वथा एकांतवादी विचारसरणीचा किंवा अशुध्द - द्रव्य संयोगाने प्राप्त होणाऱ्या अशुध्द अवस्थेचा विचार येथे नाही. आत्म्याची ही ज्ञानघन शुध्द स्वरुपावस्था अनेक आचार्यांनी आगमांच्या अनुरोधाने, युक्तीच्या अवलंबनाने, परात्पर, सर्वसंग त्यागी ऋषी-मुनींच्या उपदेशांनी आणि सरतेशेवटी, स्व-संवदनेने जाणलेली आहे. ही स्व-संवेदन - प्रत्यक्ष असलेली अनुभूती शब्दातीत आहे. आणि त्यांचे वचन हे अंशात्मक रीतीने वस्तुस्थितीचे उद्घाटन करणारे आहे.

उपयोग म्हणजे काय ?

वर जे "उपयोगो लक्षणम्" असे जीवाचे लक्षण दिले आहे ते विस्ताराने जाणले पाहिजे. उपयोगाचे दोन भेद आहेत १) दर्शनापयोग २) ज्ञानोपयोग.

दर्शनोपयोग[1] -

जेव्हा चैतन्य हे केवळ चैतन्याकार राहते तेव्हा ती दर्शन चेतना असते.

---

(१) उत्तर ज्ञानोत्पत्तिनिमित्तं यद् प्रयत्नं तदरुपं यत् स्वस्यात्मनः परिच्छेदन अवलोकन तद् दर्शन भण्यते। बृ. द्रव्य. गाथा. ४३

विषयविषयीसन्निपाते सति दर्शनं भवति । - सर्वार्थ १।१५

भावाणं सामण्णाविसेसयाण सरुवमेत्त जं ।

वण्णणहीणग्गहणं जीवेण य होदि। गोमटसार - ४८२

दुसरे, दर्शनापयोग हा वस्तूच्या सामान्य स्वरुपाला ग्रहण करतो. आजच्या विज्ञानाच्या संदर्भात कॉस्मिक कान्शसनेस म्हणजे दर्शनोपयोग. सर्व विश्वाची सामान्यरुप नेणीव (ज्ञान नव्हे) म्हणजे दर्शन होय. याचे चार भेद आहेत.

(१) चक्षुदर्शन (डोळ्याने होणारे सामान्य दर्शन)

(२) अचक्षुदर्शन- (नेत्राशिवाय इतर इंद्रियांनी होणारे सामान्य दर्शन)

(३) अवधिदर्शन- (अवधिज्ञानापूर्वी होणारे दर्शन)

(४) केवलदर्शन- (केवलज्ञान होतांना होणारे दर्शन)

कैवल्य होण्यापूर्वी म्हणजे छद्मस्थ (संसारी) अवस्थेत अगोदर दर्शन व मग ज्ञान होते. केवलीना दर्शन आणि ज्ञान युगपत्, एकाचवेळी होते. त्याचा कालक्रम नाही. एका समयात समग्र विश्वाचे त्रैकालिक स्वरुप आत्म-तत्वात प्रतिबिंबित होते. वस्तू जाणून घेण्याचा विकल्प कैवल्यात नसतो

ज्ञानोपयोग

ज्ञानचेतना आणि आत्मा या दोन वस्तु नाहीत. सम्यक्दर्शन-ज्ञान व चारित्र्य म्हणजेही ज्ञ ाान आत्माच होय. ज्ञानोपयोगाचे आठ प्रकार सांगितले आहेत. १) मति २) कुमति ३) श्रुतज्ञान ४)कुश्रुतज्ञा ५) अवधिज्ञान ६) कु-अवधिज्ञान ७) मन: पर्ययज्ञान ८) केवलज्ञान.

ज्ञान चेतनेचे कार्य म्हणजे स्व ला जाणून शिवाय पर पदार्थालाही जाणणे. म्हणजे ज्ञान स्व-पर प्रकाशक आहे. दर्शन झाल्यावर म्हणजे वस्तुचे सामान्यज्ञान झाल्यावर या वस्तूचे विशेष ज्ञ ाान 'ज्ञानचेतने' मुळे होते. मति,श्रुत व अवधि यांचे 'कु' (मिथ्या) या विशेषणांनी तीन अधिक भेद दर्शविले आहेत. ते यासाठी की, जैन आगमातून असा स्पष्ट अभिप्राय आहे की जे ज्ञान सम्यक्त्वाने सहित असेल ते सम्यकज्ञान व जे ज्ञान मिथ्यात्वाने दूषित असेल ते मिथ्याज्ञान होय. म्हणजे मिथ्यादर्शनी माणसाचे व्यवहार सत्य, प्रमाण, ज्ञान हे मिथ्या होय. कारण ते आत्मप्रतीत-पूर्ण नाही. संसारात भटकण्यास कारणीभूत होणारे ज्ञान आगमात मिथ्या म्हटले आहे.

परंतु ज्यावेळी दार्शनिक व न्यायविषयक रीतीने ज्ञानाचा विचार-आचार अकलंक, विद्यानंद, माणिक्यनंदी आदींनी केला तेव्हा वरील आगमिक विचारापेक्षा न्यायात्मक विचाराला त्यांनी प्राधान्य दिले. न्याय-शास्त्रात जे ज्ञानाचे प्रामाण्यविषयक विवेचन आहे ते तर प्रतिभासित विषयाच्या अव्यभिचारीपणावर अवलंबून आहे.[१]

ज्ञान प्रकारचे वर्णन : [१/२/३]

(१) मतिज्ञान

इंद्रिय व मन यांनी होणारे जे ज्ञान ते मतिज्ञान होय. इंद्रियांनी होते याचा अर्थ इंद्रियाच्या माध्यमाने होते. म्हणून या ज्ञानाला परोक्ष म्हटले आहे. इंद्रियांच्या शक्तीच्यी हीनाधिकता, दौर्बल्य या मुळे होणारे ज्ञान प्रमाणभूत आहेच, असा दावा करता येत नाही. पारमार्थिक दृष्टीने इंद्रिय-ज्ञान परसापेक्ष आहे म्हणून परोक्ष.[३] काही न्यायशास्त्रातून इंद्रिय-मनाने होते म्हणून प्रत्यक्षही म्हटले आहे. एके ठिकाणी अक्ष म्हणजे इंद्रिय व मन असा अर्थ घ्यावा. अकलंक देवांनी म्हटले आहे की, अ-विसंवाद व अ-व्यभिचारी ज्ञान प्रमाण मानावे. कारण, काय प्रमाण व काय अप्रमाण याची स्थिती माठी संकीर्ण आहे. एकान्तिक पक्ष घेऊन एकदम अमुक अप्रमाण किंवा अमुक प्रमाण असे न म्हणता, सत्यांशग्राही होऊन प्रमाण-अप्रमाण ठरवावे.

आधुनिक शरीर-विज्ञानाच्या दृष्टीने हे सिध्द झाले आहे की, इंद्रिय स्वत: वस्तुचे ज्ञान करुन घेत नाही. इंद्रियांच्या ठिकाणी असलेले मज्जांततू संवेदना मेंदूपर्यत पोहोचवितात. त्या संवेदनेचे रुपांतर प्रेरणेमध्ये होऊन मेंदू त्या प्रेरणेच

---

१ यथा अत्र अविसंवाद : तथा तत्र प्रमाणता˚ सिध्दिविनिश्चय- १/१२०

२ मतिश्रुतावधिमन: पर्यय केवलानि ज्ञानम्। १/९ तत्वार्थ

३ तत् प्रमाणे। आद्येपरोक्षम्। प्रत्यक्षमन्यत् तत्वार्थ- १।१०-११-१२

पृथ:करण करुन ज्ञान करुन घेतो. जिभेला चव कळत नाही, चव कोणती आहे, रस कोणता आहे, हा निर्णय मेंदू करतो.

या मतिज्ञानाचे अवग्रह (अस्तिमात्र ज्ञान), ईहा (अवग्रहाने जाणलेले अधिक जाणून घेण्याची इच्छा), अवयाय (ईहेने जाणून घेण्याचे ठरविल्याप्रमाणे वस्तूचे स्पष्ट ज्ञान), व धारणा (अवाय ने जाणलेले स्मृतीरुपाने धारण करणे) असे चार भेद प्रामुख्याने केलेले आहेत. खरे तर सज्ञान-प्रक्रियेची श्रेण्ीच यावरुन स्पष्ट होते. या अवग्रहादि ज्ञानाचे धृव-अधृव असे भेद करुन ज्ञान प्रक्रिया अधिक स्पष्ट केलेली आहेत. या मतिज्ञानाचे स्मृती, प्रत्यभिज्ञान, तर्क, अनुमान असे आणख्ी चार भेदही आहेत. त्याय प्रमाणे मतिज्ञान हे व्यक्त व अव्यक्त पदार्थानाही जाणते. त्या दृष्टीने व्यक्ता व अव्यक्ताचे १२ प्रकारे वर्णन केले आहे. १.बहुविध-एकविध ३.क्षिप्र-अक्षिप्र ४. नि:सृत-अनि:सृत ५. उक्त-अनुक्त ६. धृव-अधृव.

संशय, व अनध्यवसाय यामुळे मतिज्ञानत अनेक दोष निर्माण होतात.

श्रुतज्ञान

मतिज्ञानपूर्वक जे श्रुताचे ज्ञान होते ते श्रुतज्ञान होय. पारमार्थिक दृष्टीने आत्म्याच्या शुध्द अनुभूतीरुप श्रुतज्ञानाला भावश्रुतज्ञान म्हणतात. मिथ्यात्वी जीवाच्या श्रुतज्ञानाला कु-श्रुत ज्ञान म्हणतात.

अवधिज्ञान

द्रव्य,क्षेत्र, काल आणिा भाव यांच्या विष्शिष्ट मर्यादेत जे रुपी पदार्थाना जाणते ते अवधिज्ञान होय. हे अवधिज्ञान आत्मसापेक्ष असते. देव-नारकी-जीवांना हे ज्ञान जन्मत:च असते. या ज्ञानाला देखील कमी-जास्तपणा आत्मविशुध्दी प्रमाणे आढळतो. या ज्ञानाने जीवाला स्वत:चे किंवा अन्य जीवाचे पूर्वजन्म व पुढील जन्माचे ज्ञानही होते. हे ज्ञान वीर्यान्तराय कर्माच्या क्षयोपशमाने होते. याचे दशावधी, परमावधी व सर्वावधि असे स्थूल भेद केलेले आहेत. मिथ्यात्वी जीवाच्या अवधिज्ञानाला कु-अवधिज्ञान म्हणतात.

मन:पर्ययज्ञान

मन:पर्ययज्ञान आत्मसापेक्ष आहे. ते दुस-याच्या मनांतील ऋजु किंवा कुटिल विचारांना जाणते त्याचे १.ऋजुमती व २.विपुलमती असे दोन भेद केलेले आहे. ऋजुमती सरळ विचारांना जाणते. तर विपुलमती सरळ किंवा कुटिल वियचारानाही जाणते. हे जाणणे आत्मिक सामर्थ्याने होते. हे ज्ञान उत्कृष्ट चारित्र्यवान साधुना प्राप्त होऊ शकते.

केवलज्ञान

ज्ञानावरणीय कर्माच्या संपूर्ण नाशाने जी आत्मज्योती प्रगट होते ती केवलज्ञान असते. म्हणून हे ज्ञान निरावरण ज्ञान होय. यात आणि आात्म्यात अभिन्नताच राहते. या ज्ञानाचा विषय म्हणजे विश्वातील सर्व पदार्थ व त्याच्या वर्तमान-भूत व भविष्यकालीन सर्व अवस्था होत. कसलाही अडथळा, आवरण, प्रतिबंध नसल्याने ज्ञानमूर्ती आत्मा शुध्द ज्ञानमय रुपांत प्रकट होतो. ही अतर्क्य गोष्ट मुळीच नाही. जसे अग्नीमध्ये पडलेले इंधन प्रतिरोधी कारण नसेल तर जळू लागते, तसे ज्ञानही सर्व स्व-परप्रकाशक रीतीने प्रकट होते. आचार्य नेमिचंद्र केवल ज्ञानाचे वर्णन करताना सांगतात-

संपुण्णं तु समग्गं केवल सव्वत्त सव्वभावगयं ।

लोयालोय वितिमिरं केवलणाणं मुणेदव्वं । गोम्मटसार-४५९

केवलज्ञान हे संपूर्ण, केवळ, प्रतिपक्ष-रहित, सर्व पदार्थगत आणि लोकालोकांतील अंधाराला दूर करणारे आहे.

आचार्य कुंदाकुदांच्या मताने आत्मा निरंतर ज्ञानमयच आहे. कैवल्याची दिव्य ज्योती अंतरंगात सदैव स्व-वैभवाने तेवतच असते. ज्ञान आणि आत्मा या दोन गोष्टी नाहीत. मेघ दूर होताच स्वंय तेजाने प्रकाशित सूर्य प्रगट होतो. तशीच प्रक्रिया इथे जाणून घेतली पाहिजे.

संसारी जीव

जीवाचे १.संसारी आणि २. मुक्त असे दोन प्रकार उमास्वामींनी आपल्या तत्वार्थ-सूत्रात (२/१०) सांगितले आहेत. हे भेद न केले तर सर्वच संसारी किंवा मुक्त झाले असते. व प्रयोजनभूत धर्म-प्रतिपादनाचा हेतूही सफल झाला नसता. संसारी जीवांना त्याच्यातील दिव्य आत्मशक्तीच्या प्रत्ययासाठी अनुभवासाठी उद्युक्त करणे हा प्रमूख हेतु जिनधर्माच्या रचनेत आहे.

संसारी जीवाचा विचार यासाठी की संसारी अवस्था ही भ्रमात्मक नाही. ती वस्तुथिती आहे. संसाराचे चक्रात सापडलेल्या जीवाला भगवंताचे धर्मचक्र हे नित्य उद्‌बोधन करीत आले आहे. काहींच्या मते संसार हा मिथ्या, माया, भ्रम किंवा स्वप्न आहे. त्याच्या म्हणण्यातील तथ्य उघडकीस आणावे म्हणून आचार्यानी स्पष्टपणे "संसारिणो मुक्ताःच" हे सूत्र डोळसपणे सांगितले आहे. ही संसारी स्थिती जीवाला त्याच्याच प्रमादाने, कषायाने, अव्रताने आणि मन-वचन-शरीर-च्या चंचलतेमुळे सदैव आकर्षित होणा-या कर्म-परमाणूंच्या बंधाने प्राप्त होत आली आहे. ही संसार-स्थिती अनादी काळापासून चासलत आली असली तरी त्या स्थितीचा उच्छेद करणे शक्य आहे. तसेच काही दार्शनिक पुनर्जन्म मानीत नाहीत. त्यांचे तसे न मानणे म्हणजे जीवात्म्याचे सम्यकज्ञ ाान नसणेच होय. पुनर्जन्म न मानल्याने कसल्याही धर्म-प्रतिपादनाचा, नीति-नियम सा्ंगण्याचा, संयम प्रतिपालनाचा उच्छेद होतो. म्हणूनही संसारी अवस्थांचे निरुपण सुदीर्घपणे करणे व त्याव्दारे संसारी जीवाला उद्‌बोधन करणे आवश्यक आहे.

संसारी जीवाचे भेद-प्रभेद-

संसारी जीवांचे स्पर्श, रसना, घ्राण, चक्षु व कर्ण या इंद्रियांच्या अपेक्षेने त्रस व स्थावर असे दोन भेद केलेले आहेत. एक स्पर्श असणा-या जीवांना स्थावर जीव म्हणतात. पृथ्वी, अग्नी, वायु, जल आणि वनस्पती हे पाच एकेंद्रीय जीव होत. पृथ्वी हेच ज्यांचे शरीर आहे असे पृथ्वीकायिक जीव, अग्नी हेच ज्यांचे शरीर ते अग्निकायिक जीव, वारा (वायु) हेच ज्यांचे शरीर ते वायुकायिक

जीव, जल (पाणी) हेच ज्यांचे शरीर ते जलकायिक जीव आणि वनस्स्पती हे ज्यांचे शरीर आहे ते वयनस्पतिकायिक जीव आहेत. वनस्पतीमध्ये साधारण वनस्पति अशा त-हेच्याही असतात की एक शरीर हे असंख्य जीवाचे शरीर असते. ते शरीर नष्ट होताच असंख्य जीव मरतात. त्या असंख्य जीवांचे अस्तित्व एकरुप असते.

त्रस:

दोन, तीन, चार, व पांच इंद्रिये असणा-यांना त्रस जीव म्हणतात. या त्रसापैकी पाच इंद्रीये असणा-यापैकी १. स-मनस्क व अ-मनस्क असे पुन: दोन भेद, मन असणारे व मन नसणारे जीव, म्हणून केले आहेत.

इंद्रिय :

आपणांस जी इंद्रिये प्राप्त आहेत. ती नामकर्माच्या उदयाने प्राप्त होतात. या इंद्रियाच्या सहाय्याने जीव संसारातील पदार्थाचे ज्ञान करुन घेतो. म्हणून त्यांना काही लोक ज्ञानेद्रिय म्हणतात. या इद्रियांचे १.भावेद्रिय व २.द्रव्येंद्रिय असे दोन प्रकार आहेत. भावेंद्रिय हे द्रव्येंद्रियांचे नियामक इंद्रिय असून ते दिसत नाही. द्रव्येंद्रिय हे दृश्यरुपांत दिसते. परंतु द्रव्येंद्रियांना ज्ञान होत नाही. द्रव्येद्रिंयांचे निवृत्ती व उपकरण असेही दोन भेद आहेत. द्रव्येंद्रियांच्या सहाय्याने भावेंद्रिय ज्ञान करुन घेते. लब्धी व उपयोग हे भावेंद्रीयाचे भेद आहेत.[१]

---

१ निवृत्युपकरणे द्रव्येंद्रियम् ।लब्ध्युपयोगौ भावयेंद्रियम् । तत्वार्थ . २/१६.२/१६.१७ मतिज्ञ ानावरण- कर्माच्या क्षयोपश्यामाने होणा-या विशुध्दीने जे उपयोगात्मक ज्ञान होते ते